| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४८ /२०२३ दि. २१ /०३/२०२३

"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, उल्हासनगर वाहतुक उप विभाग हद्दीत दि. २३/०३/२०२३ रोजी **'सिंधी बांधवांचा चेटीचंड उत्सव'** निमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार असून सदर मिरवणुक झुलेलाल मंदिर उल्हासनगर नं. १ येथुन सुरू होवून हिराघाट उल्हासनगर नं. ३ समाप्त होणार आहे. सदर मिरवणुकीच्या दरम्यान मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **डॉ. श्रीकांत परोपकारी, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून आम जनतेच्या सोयीसाठी खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद व No Parking – १) झुलेलाल मंदिर चौक – सादुबेला चौक – भारत चौक – शिरु चौक – नेहरु चौक – लिंक रोड – न्यु ईरा चौक – शिवाजी चौक – पवई चौक – हिराघाट – शास्त्री चौक या मिरवणूक मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना पवई चौक पर्यत "**प्रवेश बंद**" व "**No Parking**" करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – **अ) झुलेलाल मंदिर चौक** – झुलेलाल मंदिर मार्ग – भारत चौक – गोल मैदान – तसेच बिर्लागेट व इतर ठिकाणी जाणारी वाहतूक झुलेलाल चौक येथून खेमाणी, मच्छी मार्केट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब) उल्हासनगर वाहतूक उप विभाग समोरील चौक** येथून भारत चौक मार्गे खेमाणी – धोबीघाट – झुलेलाल चौक मार्गे जाणारी सर्व प्रकारची वाहने उल्हासनगर वाहतूक उपविभाग कार्यालय येथून ओटी नं. १ मार्गे बाबा बसंतराम दरबार – मच्छी मार्केट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**क) भारत चौक** मार्गे – गोल मैदान – नेहरु चौक कडे जाणारी वाहतूक मच्छी मार्केट तसेच बाबा बेफिकी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ड) नेहरु चौक मार्गे** – शिरु चौक तसेच खेमाणीकडे जाणारी वाहतुक हि मच्छिमार्केट व भारत चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**इ) शिवाजी चौकात** – अंबरनाथ कल्याण रोडने कल्याणकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने फॉलवर लाईन मार्गे जवाहर हॉटेल – नेहरू चौक – गोल मैदान – मधुबन चौक – गुरूद्वारा चौक – शांतीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ई) शास्त्री चौक** – शास्त्री चौक येथून हिराघाटकडे जाणारी वाहतूक स्मशानभुमी चौक येथून काजल पेट्रोल पंप मार्गे इच्छीत स्थळी जातील.

फ) तसेच कल्याण अंबरनाथ रोडने अंबरनाथ दिशेने जाणारी वाहतूक होंडा शोरुम येथे डावे वळण घेवून डॉल्फीन क्लब – गुरुद्वारा चौक – मधुबन चौक – नेहरु चौक – जवाहर हॉटेल – फॉलवर लाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**सदर वाहतूक नियंत्रण अधिसचना दि. २३/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० ते १८.०० वा.पावेतो अंमलात राहील.** सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहीका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. श्रीकांत परोपकारी )**
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार,
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

Scanned with CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत** :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग./प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.

Scanned with CamScanner